<u>प्रेसनोट दि.२१/०६/२०१९</u>

<u>वानवडी पोलीस स्टेशन पुणे शहर</u>

**वॉट्सअॅप नंबरवर मेसेज व व्हिडीओ पाठविणारा इसम अटकेत**

वानवडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. २६५/२०१९ भादवी कलम २९२ सह माहिती तंत्रज्ञान कायदा २००० चे कलम ६७ (अ) मधील फिर्यादी महिला,वय-३५ वर्षे धंदा-गृहिणी रा. आझादनगर,वानवडी,पुणे यांना अज्ञात मोबाईलवरून फिर्यादीचे वॉट्सअॅप नंबरवर अज्ञात नंबर वरून व्हिडिओ आल्याने फिर्यादीचे तक्रारीवरून वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्ह्या मध्ये अज्ञात मोबाईल नंबर व्यतिरिक्त काहिएक माहिती नसताना यामध्ये अधिक तपास केले असता, एक संशयीत क्रमांक प्राप्त होवून,त्या अनुषंणाने त्याच्या पुण्यातील एक कॉलरकडे आम्हांस विश्लेषणामध्ये प्राप्त झालेल्या संशयीत मोबाईल क्रमांकाबाबत विचारले असता,त्यांने सदरचा मोबाईल नंबर हा फिरोज अन्सारी याचा असल्याचे सांगितले. त्यावरुन आरोपी फिरोज मेहमुद अन्सारी,वय-२८ वर्षे धंदा-बेकरी कामगार राहणार स.नं.१०८, रामनगर, रामटेकडी, हडपसर, पुणे याचा शोध घेवून त्यास पो.स्टे आणून अधिक सी.डी.आर.चे आधारे चौकशी केली असता त्यांनी सदर दाखल गुन्हा स्वतः केलेबाबत कबुली देवून दाखल गुन्हा उघडकीस आणला आहे.

दाखल गुन्हा हा क्रांतीकुमार पाटील, वपोनिरी.वानवडी पो. स्टे. पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली पो.शि.प्रतिक लाहिगुडे, व पो.ना.संतोष राठोड यांनी कुशलतापुर्ण तपास करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

(क्रांतीकुमार पाटील)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
वानवडी पोलीस स्टेशन पुणे